# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर- २३६/२०२४

**अपिलार्थी, श्री.नितीन देशमुख**
००१, सावित्री आवास,
मोहनानंद नगर, मांजर्ली
बदलापूर (प), जि.ठाणे ४२१ ५०३.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, उमरोली खु.,
ता.मुरबाड, जि.ठाणे.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी
पंचायत समिती कार्यालय मुरबाड,
ता.मुरबाड, जि.ठाणे ४२१ ४०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १०.०६.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २१.०४.२०२३ | - | २०.०६.२०२३ | १३.१०.२०२३ |

अपिलार्थी यांनी दि. १२.०१.२०४ रोजीच्या अर्जान्वये *" माहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले नाही. "*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १०.०६.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.आनंद वामन मुरेकर, विस्तार अधिकारी, पंचायत समिती मुरबाड उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.भारती कुशाभाऊ पाष्टे, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, उमरोली (खु.), ता.मुरबाड उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" दि.०१ एप्रिल २०१७ ते दि.२१.०४.२०२३ या कालावधीतील प्रतिवर्षी ऑडिट रिपोर्टच्या प्रति नमुना २७ लेखा परीक्षणातील आक्षेपाच्या पूर्ततेच्या मासिक विवरण नोंदवही नमुना ३० ग्रामपंचायत लेखा परीक्षण आक्षेप पूर्तता नोंदवही."*

सदर प्रकरणी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांना दि.२३.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये ग्रामपंचायत कार्यालयामध्ये समक्ष माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याबाबत अपिलार्थी यांची पोहोच सादर केली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.२३.११.२०२३ रोजी ग्रामपंचायत कार्यालयात समक्ष माहिती दिलेली आहे. तथापि प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि.१३.१०.२०२३ रोजी माहिती दि.३१.१०.२०२३ पर्यंत पुरविण्याबाबत आदेश पारित केले होते. यावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उशिराने माहिती पुरविली आहे.

यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या

शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती देण्यात आलेली आहे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, उमरोली (खु.), ता.मुरबाड यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २१.०४.२०२३ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतर उशिराने माहिती पुरविली आहे. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठ रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी दि.०५.०८.२०२४ रोजीच्या सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दिनांक ०५.०८.२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता घेण्यात येईल.

**(शेखर चन्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १० जून, २०२४ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, उमरोली खु.,
ता.मुरबाड, जि.ठाणे.